# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.10.2024** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्रातल्या विविध कामांचं उद्घाटन आणि भूमीपूजन
2. जगाच्या विविध भागांमध्ये भारताचे पाच सेमीकंडक्टर प्लांट लवकरच सुरू होणार
3. परदेशी गंगाजळीमध्ये 700 अब्ज अमेरिकन डॉलर्सचा टप्पा ओलांडून भारताची अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावर
4. 3 ऑक्टोबर यापुढे 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय आणि
5. छत्तीसगड राज्यातल्या नारायणपूर जिल्ह्यात काल सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत 28 जण ठार

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज एकदिवसीय दौऱ्यावर महाराष्ट्रात येणार आहेत. मुंबई, ठाणे आणि वाशिम जिल्ह्यातल्या विविध कामांचं उद्घाटन आणि भूमीपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. वाशिममध्ये कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रमांचा शुभारंभ पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. तसंच बंजारा समाजाचा वारसा जपणाऱ्या बंजारा संग्रहालयाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होईल. वाशिममध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या अठराव्या हप्त्याच्या वितरणाला मोदींच्या हस्ते प्रारंभ होणार आहे. याप्रसंगी, देशभरातल्या साडे नऊ कोटी शेतकऱ्यांच्या थेट खात्यात वीस हजार कोटींहून अधिक लाभ मिळणार आहे. तसंच नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत दोन हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त लाभही जारी करणार आहेत. तर ठाणे आणि मुंबईत प्रमुख मेट्रो आणि रस्ते प्रकल्पांचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होईल. यामध्ये 14 हजार 120 कोटी रुपये खर्चून बांधलेल्या मुंबई मेट्रो लाईन-3 च्या बीकेसी ते आरे जीव्हीआरएल सेक्शन मेट्रोला पंतप्रधान बीकेसी मेट्रो स्टेशनवरून हिरवा झेंडा दाखवतील. तसंच बारा हजार कोटी रुपये खर्चाच्या ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी, 3 हजार 310 कोटी रुपयांच्या छेडा नगर ते आनंद नगरपर्यंतच्या एलिव्हेटेड ईस्टर्न फ्रीवेच्या विस्तारीकरण प्रकल्पाची पायाभरणीही पंतप्रधान करणार आहेत. 2 हजार 550 कोटी रुपयांच्या नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (NAINA) प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची पायाभरणी यावेळी होणार आहे.

**<u>कौटिल्य पीएम</u>**

जगाच्या विविध भागांमध्ये भारताचे पाच सेमीकंडक्टर प्लांट लवकरच सुरू होणार असून येत्या काही काळात भारतीय बनावटीच्या चिप्स जगाला उपलब्ध होतील असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. दिल्लीत झालेल्या कौटिल्य आर्थिक परिषदेला ते काल संबोधित करत होते. भारताचे स्थान मोबाईल आयातदार ते मोबाईल उत्पादक असे बदललं असून प्रत्येक क्षेत्रात गुंतवणुकीच्या भरपूर संधी असल्याचं पंतप्रधानांनी यावेळी नमूद केलं. भारत वेगाने वृद्धिंगत होणारी जगातली पाचवी अर्थव्यवस्था असल्याचे अधोरेखित करुन आणीबाणीच्या काळात भारतीय युगाची चर्चा होत आहे. यावरून भारतानं जागतिक विश्वास संपादन केला असल्याचं दिसून येतं. आर्थिक तंत्रज्ञान स्वीकारण्याच्या बाबतीत भारत अव्वल असून, जागतिक स्तरावरील रिअल टाईम

व्यवहारांपैकी निम्मे व्यवहार भारतात होत असल्याचं त्यांनी नमूत केलं. जागतिक नेते आणि आर्थिक तज्ज्ञ भारताच्या वृद्धीबाबत आशावादी असल्याचंही नमूद केलं.

**राष्ट्रपती-जागतिक वातावरण बदल**

जागतिक वातावरण बदल आणि पर्यावरणीय प्रदुषण या वास्तव समस्यांचा नागरिकांनी सामना करुन त्यावर निर्णायक कारवाई करण्याचं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी केलं आहे. राजस्थान इथं माऊंट अबू इथं आयोजित स्वच्छ आणि निरोगी समाजासाठी अध्यात्म या विषयावरील जागतिक शिखर परिषदेला त्यांनी काल संबोधित केलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. शेतीसाठी रासायनिक खतांऐवजी नैसर्गिक खतांचा वापर करण्याला प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या धोरणाविषयी त्यांनी समाधान व्यक्त केलं. केंद्र सरकारनं सुरू केलेल्या एक पेड मां के नाम या वृक्षारोपण मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे असं आवाहनही त्यांनी देशवासियांना यावेळी केलं.

**परदेशी-गंगाजळी**

चीन, जपान आणि स्वित्झर्लंड नंतर परदेशी गंगाजळीमध्ये 700 अब्ज अमेरिकन डॉलर्सचा टप्पा ओलांडणारी, भारत ही जगातील चौथी अर्थव्यवस्था बनली आहे. भारताच्या परकीय चलनाच्या गंगाजळीत सुमारे 12 अब्ज अमेरिकन डॉलर्सची वाढ होऊन 27 सप्टेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात ती 704 अब्जावर गेली आहे. 20 सप्टेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात परकीय चलन साठा 2 अब्ज 8 कोटीनी वाढून 692 अब्ज 3 कोटी डॉलरवर पोहोचला होता. परकीय चलन साठयात या झपाट्याने झालेल्या वाढीमुळे जागतिक आर्थिक अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी भारत आता सज्ज झाला आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारतीय चलनाला अधिक स्थिरता मिळाली आहे. रिजर्व बँकेनं काल जारी केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताचा सोन्याचा साठा सुमारे 2 अब्ज 18 कोटी डॉलर्सनं  वाढून तो आता 65 अब्ज 79 कोटी डॉलर्सवर पोहोचला आहे.

**हरियाणा मतदान**

हरियाणा विधानसभेच्या मतदानाला आज सुरुवात झाली. एकाच टप्प्यात 90 जागांसाठी मतदान होत आहे. सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली आहे. एक हजार एकतीस उमेदवारांचं भविष्या दोन कोटी तीन लाखाहून अधिक मतदार आज मतपेटीत बंद करतील. राज्यात 20 हजार 632 मतदान केंद्रांवर मतदान होत आहे. मतदान सुरळीत, निष्पक्ष पार पडावे यासाठी सर्वच मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग सुविधेसह पुरेशी सुरक्षा व्यवस्था पुरवण्यात आल्याचं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी पंकज अग्रवाल यांनी सांगितलं.

**अभिजात भाषा**

केंद्र सरकारनं गुरुवारी मराठीसह आसामी, बंगाली, पाली आणि प्राकृत भाषांना अभिजात दर्जा दिला, या निर्णयाचं विविध मान्यवरांनी स्वागत केलं आहे. कोलकाता विद्यापीठातल्या बौद्ध अभ्यास विभागातले प्राध्यापक उज्ज्वल कुमार यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया नोंदवताना या निर्णयामुळे सांस्कृतिक वारसा असलेल्या भाषांच्या संवर्धनास मदत होईल तर साहित्याच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासही मदत होणार असल्याचं सांगितलं. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचं जाहीर झाल्यानंतर काल राज्य मंत्रिमंडळानं पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचं अभिनंदन केलं. तसंच 3 ऑक्टोबर हा दिवस यापुढे 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.

**संयुक्त राष्ट्र-दहशतवाद**

दहशतवाद विरोधी आंतरराष्ट्रीय करार तत्काळ स्वीकार करावा यासाठी भारतानं आवाहन केलं आहे. भारतानं पहिल्यांदा तीस वर्षीपुर्वी हा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रसंघाच्या कायदा समितीला संबोधित करताना भारताच्या कायदा अधिकारी आर. मैथिली यांनी दहशतवादी गटांच्या वाढत्या ताकदीविषयी चिंता व्यक्त केली.

दहशतवादी गट, ड्रोन सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर क्षमता वाढवण्यासाठी करत असल्याचं त्यांनी नमूद केलं. आंतरराष्ट्रीय दहशतवादावरील व्यापक कराराला अंतिम रुप देण्यासाठी सर्व देशांनी प्रयत्नशील राहाण्याच्या गरजेवर भर दिला.

**<u>इस्रायल-हिज्जबुल्ला</u>**

इस्रायलच्या संरक्षण दलानं गेल्या चार दिवसांत दक्षिण लेबनॉन मध्ये केलेल्या कारवाईत दोन हजारहून अधिक लष्करी तुकड्या लक्ष्य केल्याचे आणि अडीचशे हिजब्बुलाह दहशतवाद्यांना इस्रायलच्या संरक्षण दलानं कंठस्नान घातल्याचं इस्रायल लष्करानं दिलेल्या माहितीत म्हटलं आहे. या मृतांमध्ये 5 लष्करी तुकड्या, 10 कंपन्या आणि 6 प्लाटून कमांडरचा समावेश असल्याचं समावेश आहे. त्याचवेळी इस्रायल दक्षिण लेबनॉनमध्ये हवाई हल्ले करतो आहे. हिजबुल्लाहाने अधिकृतपणे त्यांच्या बळींची संख्या जाहीर केलेली नाही.

**<u>अमेरिका-हौती</u>**

अमेरिका आणि ब्रिटनच्या लष्करानं येमेनमध्ये हुती बंडखोरांच्या नियंत्रणाखाली असलेल्या डझनभर केंद्रांवर संयुक्त हल्ला केला आहे. हल्ल्यात शस्त्रास्त्र, लष्करी तळ आणि इराण समर्थित सशस्त्र गटाकडून वापरल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यात आलं. हुथी नियंत्रित माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, सशस्त्र गटाच्या नियंत्रणाखाली असलेल्या लष्करी तळाच्या होडेदाह विमानतळ आणि कातायेब परिसरात सात हल्ले करण्यात आले तर सयान जिल्ह्याची राजधानी सनामध्ये चार ठिकाणी तर येमेनच्या धमार मध्ये दोन ठिकाणी हल्ले करण्यात आले. इस्रायल विरोधात लष्करी कारवाई वाढवण्याच्या हुथीच्या धमक्यांच्या पार्श्वभुमीवर हा हल्ला करण्यात आला.

**<u>छत्तीसगड-माओवादी</u>**

छत्तीसगड राज्यातल्या नारायणपूर जिल्ह्यात काल सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत 28 जण ठार झाल्याची बातमी आहे.  चकमकीतील मृतांची संख्येत वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नारायणपूर जिल्ह्यातल्या दक्षिण अबुझमद भागात काल दुपारी माओवादी लपल्याची माहिती मिळाल्यानंतर राज्य सुरक्षा दल आणि विशेष सुरक्षा दल यांच्या संयुक्त पथकानं गोवेल, नेंदूर आणि थुलथुली भागात शोधमोहिमेला सुरुवात केली. त्यानंत झालेल्या चकमकीत सुरक्षा जवानांनी 28 माओवाद्यांना कंठस्नान घातले. माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले असून, घटनास्थळावरून एके-47, रायफलसह अनेक शस्त्र जप्त करण्यात आली. परिसरात सुरक्षा दलांची शोधमोहिम जारी असल्याची माहिती आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

महिलांच्या टी-20 विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत पहिल्याच सामन्यात काल भारताला पराभवाचा सामना करावा लागला. न्यूझीलंडनं भारताचा 58 धावांनी पराभव केला. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना 4 गडी गमावून 160 धावा केल्या; प्रत्युत्तरात भारताचा संघ 102 धावांवर गारद झाला. न्यूझीलंडकडून सोफी डिव्हाइननं सर्वाधिक नाबाद 57 धावा केल्या, तर रोजमेरी मायरने 4 बळी घेतले.दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं वेस्ट इंडिजचा 10 गडी राखून पराभव केला.

# याबरोबरच हे बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.